# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
# राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM)
# एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण समिती,जळगांव
# कंत्राटी पध्दतीने भरती प्रक्रीया
## जाहिरात

जळगांव शहर महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) जळगांव शहर मनपा, एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण समिती जळगांव अंतर्गत खालील पदे ठराविक वेतनावर कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व संबधित उमेदवारांनी शैक्षणिक अर्हताधारण करत असल्यास उमेदवारांनी दि. ११ /०३ / २०१७ ते दि.१७/०३/२०१७ संध्या.५.०० वा.पावेतो श्री.छत्रपती शाहू महाराज रूग्णालय,शाहूनगर जळगांव येथील कार्यालयाकडे अर्ज सादर करावे.

| अ. क्र | पदनाम | वय | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव / अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | जातप्रवर्गानुसार पद संख्या | एकुण मानधन रू. प्रतिमाह |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी | ४५ वर्ष आणि सेवानिवृत्त अधिकारी वयोमर्यादा ६२ वर्ष | M.B.B.S | मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस पदवी व सार्वजनिक आरोग्य विभागातील कामाचे अनुभवास प्राधान्य + MMC रजिस्ट्रेशन | पद १ | ४०,०००/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी अर्ध वेळ | वयोमर्यादा ३८ व इतर मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष | १. स्त्री रोग तज्ञ - पद १<br>२. बालरोग तज्ञ - पद १<br>३. फिजीशियन - पद १<br>४. भुलतज्ञ - पद १ | मान्यता प्राप्त विद्यापिठाची एम.बी.बी.एस पदवी व संबंधीत विषयातील पदव्युत्तर पदवी आणि रुग्णालयातील कामाचे अनुभवास प्राधान्य + MMC रजिस्ट्रेशन | (एकुण-४) | २४,०००/- |
| ३ | स्टाफ नर्स<br>(Nurse - mid Wifery) | वयोमर्यादा ३८ व इतर मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष | १२ th pass + GNM Course | अनुभव असलेस प्राधान्य व MNC रजिस्ट्रेशन आवश्यक | खुला पदे - २<br>अ.जा. - पद १<br>अ.ज. - पद - १<br>विजा.भ.ज - पद १<br>इमाव - पद -१ | ९०००/- |
| ४ | ए.एन.एम | वयोमर्यादा ३८ व इतर मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष | १० th Pass + ANM Course, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक | अनुभव असलेस प्राधान्य व MNC रजिस्ट्रेशन आवश्यक | पद १-खुला ,<br>पद १-अ.जा.<br>पद १-अ.ज.<br>(एकुण-३) | ७५००/- |
| ५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | वयोमर्यादा ३८ व इतर मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष | BSc + शासनमान्य विद्यालयाचा DMLT अभ्यासक्रम उत्तीर्ण | अनुभव असलेस प्राधान्य | पद १ -खुला ,<br>पद १ -अ.जा.<br>पद १ -अ.ज.<br>(एकुण-३) | ७०००/- |
| ६ | औषध निर्माता (Pharmacist) | वयोमर्यादा ३८ व इतर मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष | D.Pharm | अनुभव असलेस प्राधान्य | पद १-अ.जा. , पद १ अ.ज.<br>खुला - १<br>(एकुण-३) | ८०००/- |
| ७ | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाऊटंट | वयोमर्यादा ३८ व इतर मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष | बी.कॉम + MSCIT + मराठी ३० wpm + इंग्लीश - ३० wpm | अकाऊंटींग मध्ये अनुभव असल्यास प्राधान्य | पद १-खुला,<br>पद १-अ.जा.<br>(एकुण-२) | ८०००/- |

**टिप - दि. ११/०३/२०१७ पासून ते दि.१७/०३/२०१७ संध्या.५.०० वा. पावेतो श्री.छत्रपती शाहू महाराज ,रूग्णालय शाहूनगर जळगांव येथील कार्यालयाकडे अर्ज स्विकारले जातील .**

**अटी व शर्ती:-**

१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणाऱ्या पात्र उमेदवारांची निवड नियमानुसार व आवश्यक त्या पदांची Skill test देखील घेण्यात येईल.

२) सदरील पदे NUHM अंतर्गत राहतील त्याचा जळगांव शहर महानगरपालिका आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

३) एकुण पदाच्या संख्येमध्ये व पदनिहाय आरक्षणामध्ये आवश्यकतेनुसार बदल होवू शकतो.

४) सदरील पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ NUHM प्रकल्प कालावधी पुरते भरावयाची असून प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील ,सुरुवातीला निवड झालेल्या उमेदवारांना ३१ मार्च २०१७ पावेतो तात्पुरत्या स्वरुपात कामाचे आदेश दिले जातील तदनंतर शासनाकडील येणारे मार्गदर्शक सुचनांनुसार व कामाच्या अहवालाच्या पडताळणीनुसार शासनानिर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

५) नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपले काम समाधानकारक न आढळल्यास तसेच कोणत्याही प्रकारची गैरवर्तवणुक केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

६) सदर नियुक्ती दिलेल्या पदावर कार्यरत असतांना त्या पदावर नियमित करणेकरीता हक्क सांगणे साठी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

७) उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार व शासकीय अनुभव असलेले उमेदवार यांना प्राधान्य देणेत येईल.

८) उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रतीसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

९) तोंडी मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे.

१०) निवड/ नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर , कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांनी राखून ठेवले आहेत.

११) उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जामध्ये उल्लेख करणे आवश्यक आहे. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या दोन सत्यप्रती जोडण्यात याव्यात (जन्मतारीख, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र व मार्कशीट, अनुभव आणि शासन निर्णयानुसार जातीचा दाखला ,रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र) अर्जामध्ये संपुर्ण नांव ,पत्ता,जन्मतारीख ,जात ,पोटजात , शैक्षणिक अहर्ता ,पुर्वानुभव नमुद करावा. तसेच अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो दयावा.

१२) पात्र उमेदवार व प्रतिक्षा यादी उमेदवार यांची यादी नोटीसबोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.

१३) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी व राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

१४)मागासवर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रतिक्षा यादीतील खुल्या प्रवर्गातील उमेदवारास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

१५)नेमणुक झालेल्या उमेदवारास सोसायटी बरोबर विहीत नमुन्यात (१००/- रु. च्या बॉन्ड पेपरवर )करारनामा करून दयावा लागेल.

१६) ही जाहीरात जळगांव शहर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्ड व http://www.jcmc.gov.in/ या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच अर्ज नमुना वेबसाईटवर उपलब्ध आहे. तो बिनचुक भरुन सादर करणे आवश्यक आहे.

**स्वाक्षरी /-**

**आयुक्त**
**जळगांव शहर महानगरपालिका ,**
**जळगांव**

**प्रतः- नोटीस बोर्ड, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**